



# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक २४९, गुरुवार २० जुन २०२४ | संपादक : देविदास आबूज | कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

# आता डॉ. विखे यांच्यावर टीका करणे योग्य नाही

## राजकारणातील संघर्षाला मुठ माती देण्याचे खा. लंके यांचे सुतोवाच

केडगांव : प्रतिनिधी

**१३ तारखेला मतदान झाल्यानंतर मी विरोधी उमेदवार मा. खा. डॉ. सुजय विखे यांच्यावर टीका करणे योग्य नाही. झालं गेलं सोडून दिले पाहिजे असे सांगत जिल्हयाच्या राजकारणातील संघर्ष थांबविला पाहिजे असे सुतोवाच खासदार नीलेश लंके यांनी केले.**

लोकसभा निवडणूकीमध्ये विजय संपादन केल्यानंतर केडगांवकरांच्या वतीने लंके यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी लंके यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

खा. लंके म्हणाले,तसे पाहिले तर विखे परिवार जिल्हयात मोठा परिवार आहे. सहकारात त्यांचे मोठे काम आहे. निवडणूकीत त्यांच्या विरोधात बोलणे ठिक आहे. माझ्याकडून किंवा त्यांच्याकडून एखादा शब्द घसरला असेल तर आता तेच लावून धरायचे का ? महाराष्ट्रात फिरताना मी अभिमानाने सांगतो की देशातला पहिला सहकारी साखर कारखाना पद्मश्री विठ्ठलराव विखे यांनी उभा केला. राज्याचे महसूल मंत्री माइ-या जिल्हयातील आहेत हे देखील मी अभिमानाने सांगतो. आपला अभिमान आपणच सांगितला पाहिजे असे ते म्हणाले.

लंके पुढे म्हणाले, मला अजून काही बंधने आहेत. नुकतेची मी माझे ओळखपत्र तयार करून आणले असून शपथ घेतल्याशिवाय मला बैठका बोलविता येणार नाहीत. अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेता येणार नाहीत. सध्या शिक्षक मतदारसंघाची आचारसंहिता सुरू आहे. आचारसंहिता शिथील झाल्यानंतर आपण कामांचा धडाका लावू अशी ग्वाही खासदार लंके यांनी दिली.

यावेळी पुढे बोलताना खा. लंके म्हणाले, नगर शहरात मी प्रत्येक प्रभागात फिरणार आहे. लोकांमध्ये जाऊन बसल्याशिवाय लोकांचे प्रश्न कळत नाहीत. एखाद्याने काही काम सांगितले तर त्याची तिव्रता मला कळणार नाही, परंतू मी नजरेखालून एखादे काम घातले तर सांगण्याचीही गरज नाही. केडगांव परीसरात भुयारी मार्गाची गरज आहे. श्रीगोंदे तालुका आणि देहेरे येथेही अशाच बोगद्याची गरज असल्याचे लंके म्हणाले.

खा. लंके म्हणाले, प्रचारारदम्यान मी स्टेशन रोड येथे गेलो होतो. तेथील माथाडी कामगारांची पिण्याची अडचण आहे. कामगार आयुक्तांना फोन केल्यानंतर एका कंपनीच्या सीएसआर फंडातून पाण्याची सोय करण्यात आली. रेणूकामाता मंदीर परीसरात विकासासाठी निधीच गरज आहे. त्यासाठी नियोजन करण्यात येईल. केंद्रीय तिर्थक्षेत्र विकास निधीतून मदत मिळते अशी माहीत आहे. राज्यातील कामांचा मला अंदाज होता आता केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहीती घेउन कामे मार्गी लावण्यात येणार असल्याचे लंके यांनी स्पष्ट केले.



**लोकसभा निवडणूकीत विजय संपादन केल्यांनतर केडगांवकरांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात लंके यांनी उपस्थितांशी संवाद साधला.**

### डोक्यावरचं ओझे खाली करायचं आहे !

**ध्येय, इच्छाशक्ती असल्यानंतर शंभर टक्के काम मार्गी लागते. आज माझ्या डोक्यावर ओझं आहे. ते मला खाली करायचे आहे. तुम्ही मला मतांतून दान दिले. माइ-यासाठी चोविस तास पळालेल्या कार्यकर्त्याला अडचण आली, संकट आले तर धावून जाणे माझे काम आहे.**

**नीलेश लंके, खासदार**

### ना. विखे यांना आशिर्वाद मागणार

**राधाकृष्ण विखे हे जिल्हयाचे पालकमंत्री आहेत. माझे एखादे काम असेल तर मी त्यांच्याकडे हक्काने जावू शकतो. असे राजकारण पाहिजे. जिल्हा नियोजन मंडळाच्या पहिल्या बैठकीत मी त्यांचा आशिर्वाद मागणार आहे. असेच करून आपणास जिल्हयाचे राजकारण बदलायचे आहे. राजकारणात एखादा माणूस कायमचा शत्रू अथवा मित्र नसतो. असा बदल आपण सामाजाला सांगायचा नाही तर तो आपल्यातून घडवायचा असल्याचे लंके म्हणाले.**

### राठोड, ठुबे, कोतकरांची आठवण

**अनिलभैय्या राठोड, वसंत ठुबे व संजय कोतकर यांची या निवडणूकीदरम्यान मला प्रकर्षाने आठवण झाली. ठुबे व कोतकर असते तर मला केडगांवमध्ये निवडणूकीदरम्यान पळण्याची वेळ आली नसती. इतर कार्यकर्त्यांनी ठुबे व कोतकर यांची उणिव भरून काढली. नगर शहरात अनिल भैय्या असते तर मी शहरातून बरोबरीने मते घेतली असती. ही उणीव आपल्याला पुढील काळात भरून काढायची असल्याचे लंके म्हणाले.**

### नव्या नवरीप्रमाणे माझी अवस्था !

**सध्या नवीन वऱ्हाड आहे. माझं लग्न झालंय परंतू अजून हाळद फिटली नाही. त्यामुळे मला खालचं वरचं काही कळेना, अजून सत्कार समारंभच सुरू आहेत. नवीन नवरी घरात आल्यानंतर तीला ताळमेळ लागत नाही. चार दोन दिवस गेल्यानंतर कोणत्या डब्यात साखर, शेंगदाणे, सासू पैसे कुठे ठेवते ? सासूचे कोणत्या मुलावर जास्त प्रेम आहे. तसाच मी अंदाज घेतो असल्याची मिश्किल टिपन्नी लंके यांनी यावेळी बोलताना केली.**

# मा. खा.सुजय विखे यांना ईव्हीएम वर संशय

## चौकशीसाठी निवडणूक आयोगाला केला अर्ज

नगर : प्रतिनिधी

**पराभवानंतर मात्र डॉ. सुजय विखे पाटील यांनी मात्र ईव्हीएम मशीनवर आक्षेप नोंदवला आहे व आता सुजय विखे यांनी ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटची चौकशी करण्याची मागणी केली आहे व त्यासंबंधीचा अर्ज देखील निवडणूक आयोगाकडे सादर केला आहे.**

नुकत्याच देशामध्ये लोकसभा निवडणुका पार पडल्या व ४ जूनला या निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला. आपण जर या लोकसभा निवडणुकीचे विश्लेषण किंवा एकंदरीत निकाल पाहिला तर यामध्ये महाराष्ट्राची लोकसभा निवडणूक हे संपूर्ण देशामध्ये वेगळी ठरली. केंद्रामध्ये जरी एनडीएचे सरकार स्थापन झाले, मात्र महाराष्ट्रात महाविकास आघाडीने महायुतीला चारीमुंड्या चित करत आपली ताकद दाखवून दिली.

महाराष्ट्रातील ज्या लोकसभा मतदारसंघांची विशेष चर्चा झाली यामध्ये अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघ हा संपूर्ण राज्यामध्ये लक्ष वेधून घेणारा ठरला. अहमदनगर जिल्ह्यातील बडे राजकीय प्रस्थ म्हणून समजले जाणारे विखे कुटुंबातील भाजपचे खासदार असलेले डॉ. सुजय विखे आणि महाविकास आघाडी कडून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गट यांचे उमेदवार निलेश लंके यांच्यामध्ये प्रामुख्याने लढत झाली.

संपूर्ण राज्याचे लक्ष या लोकसभा निवडणुकीकडे होते व निलेश लंके यांनी डॉ. सुजय विखे पाटील यांचा तब्बल २९ हजार ३१७ मतांनी पराभव केला. एक अर्थाने निलेश लंके यांनी विखे कुटुंबाचे एक राजकीय प्रस्थालाच धक्का दिला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

परंतु आता या झालेल्या पराभवानंतर मात्र डॉ. सुजय विखे पाटील यांनी मात्र ईव्हीएम मशीनवर आक्षेप नोंदवला आहे व आता सुजय विखे यांनी ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटची चौकशी करण्याची मागणी केली आहे व त्यासंबंधीचा अर्ज देखील निवडणूक आयोगाकडे सादर केला आहे.
डॉ. सुजय विखे यांनी केली ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची चौकशीची मागणी
याबाबत सविस्तर वृत्त असे की, लोकसभा निवडणुकीत अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून पराभूत झालेले भाजपचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्यासह अनेक नेत्यांनी निवडणूक आयोगाकडे अर्ज केलेला आहे व यामध्ये जवळपास १० उमेदवारांचा जवळपास समावेश आहे. या सगळ्या नेत्यांनी ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची चौकशीची मागणी केलेली आहे.
याबाबतचे वृत्त इकॉनॉमिक टाइम्सने दिलेले असून त्या वृत्तानुसार या संबंधीची चौकशी करण्यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे एकूण दहा अर्ज दाखल करण्यात आलेले आहेत. यातील बहुतेक उमेदवारांनी एक ते तीन ईव्हीएम युनिटची पडताळणी करावी अशी मागणी केलेली आहे.
परंतु काहींनी मात्र यापेक्षा जास्त युनिटची चौकशी करावी अशा पद्धतीचे मागणी केलेली आहे. विशेष म्हणजे या प्रकारची चौकशी करण्यासाठी प्रत्येक ईव्हीएम मशीन करिता चाळीस हजार रुपये आणि त्यावर १८ % जीएसटी भरावा लागणार आहे. सुजय विखे पाटील यांनी मात्र विधानसभा मतदारसंघ निहाय ईव्हीएम मशीन चौकशी करण्याची मागणी केली आहे.



**डॉ. सुजय विखेशिवाय या नेत्यांनी केली आहे चौकशीची मागणी**

डॉ. सुजय विखेंशिवाय ओडिसातील झारसुगुडा येथील बिजू जनता दलाचे उमेदवार दिपाली दास यांनी देखील अशाच पद्धतीचे मागणी केलेली आहे. भाजपचे टंकघर त्रिपाठी यांनी त्यांचा १२६५ मतांनी पराभव केलेला आहे. दिपाली दास या झारसूगुडा या लोकसभा मतदारसंघातून खासदार झालेले आहेत. दिपाली दास यांनी जवळपास डझनभर ईव्हीएम व्हीव्हीपीएटी मशीनच्या चौकशीची मागणी केलेली आहे.
यावद्दल त्यांचा आक्षेप आहे की मतमोजणी मध्ये ज्या काही फेऱ्या होत्या त्यातील १९ फेऱ्यांपैकी त्या सतराव्या फेरीपर्यंत आघाडीवर होत्या मात्र त्यानंतर झालेल्या दोन फेऱ्यांमध्ये अचानक मताधिक्यामध्ये मागे पडल्या. त्यामुळे त्यांना ईव्हीएम मध्ये काहीतरी घोटाळा झाला आहे असा संशय आहे व त्याकरता त्यांनी ही मागणी केलेली आहे.

# जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास असेल तर यश निश्चित - खा. नीलेश लंके

राहुरी : श्रीकांत जाधव/ ऋषि राऊत

**जिद्द, चिकाटी व आत्मविश्वास उराशी बाळगून वाटचाल केल्यास यश हे निश्चित असते, शेतकरी कुटुंबातील मुलांनी डॉक्टर, अभियंता याशिवाय एमपीएससी व यूपीएससी परीक्षेत यश संपादन करून नावलौकिक वाढवावा त्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यास आम्ही कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगरचे नवनिर्वाचित खा.नीलेश लंके यांनी केले.**

राहुरीतील नगर-मनमाड मार्गालगत असलेल्या विठ्ठला लॉन्स येथे युवा नेते राजू भाऊ शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या धर्मवीर छत्रपती संभाजीराजे युवा प्रतिष्ठान व परिस्पर्श फाउंडेशनच्यावतीने राहुरी तालुक्यातील विविध शाळांत गुणवत्ता यादीत आलेल्या ३५० गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा खा. लंकेच्या हस्ते पार पडला. प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास सेवानिवृत्त कस्टम अधिकारी भागीनाथ शेटे, मुख्याध्यापीका मीनाक्षी सोनकर, संभाजीनगरचे मच्छिंद्र देवकर,प्रियाली मुसमाडे, नानासाहेब जुंधारे, प्रभाकर म्हसे, पोपटराव पोटे, शंभू बाबा गोसावी, अर्जुन म्हसे, पारनेरचे उपनगराध्यक्ष अर्जुन भालेकर, उर्वरीत पान ३ वर




**धर्मवीर छत्रपती संभाजीराजे युवा प्रतिष्ठान व परिस्पर्श फाउंडेशनच्यावतीने राहुरी तालुक्यातील विविध शाळांत गुणवत्ता यादीत आलेल्या ३५० गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा खा. नीलेश लंकेच्या हस्ते पार पडला.( छाया : सागर भालेराव)**

# नगरमध्ये वन ॲण्ड ओन्ली विवेक भैय्या!

## जिल्ह्यातील शिक्षक संघटनांचा पाठींबा

नगर : प्रतिनिधी

**कर्मयोगी स्व. शंकरराव कोल्हे यांचे नातू विवेक कोल्हे यांना नगर जिल्हयामधून मोठा पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे. टीडीएफ नगर, नगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ, महानगर टीडीएफ आणि माध्यमिक शिक्षक संघटना, क्रीडा शिक्षक संघटना, रयत सेवक संघटना यांच्यासह इतर संघटनांच्या प्रतिनिधींनी विवेक कोल्हे यांना पाठिंबा दर्शविल्याने नगर जिल्हयात वन ॲण्ड ओन्ली विवेक भैय्या कोल्हे असे चित्र आहे !**

नाशिक शिक्षक मतदार संघातील पाचही जिल्हयात तरूण तथा उच्चशिक्षित विवेक कोल्हे यांना शिक्षक मतदारांचे मोठे पाठबळ मिळत आहे. त्यांच्या विरोधी उमेदवारांना कोल्हे यांनी कधीच मागे टाकले आहे. एक अभ्यासू उर्वरीत पान ३ वर



### मला शंभर हत्तींचे बळ!

**शिक्षकांचे प्रश्न सोडवायचे असतील तर प्रत्यक्ष पुढेयेऊन संघटनेचा विचार मनाला उर्जा देणारा आहे. मला पाठींबा देणाऱ्या सर्व संघटना, त्यांचे पदाधिकारी यांचा विश्वास मी सार्थ ठरविणार आहे. विविध संघटनांच्या पाठबळामुळे मला शंभर हत्तींचे बळ मिळाले आहे. स्व. शंकरराव कोल्हे यांच्याप्रती दाखविलेले प्रेम हा या निवडणूकीच्या निमित्ताने मला मिळालेला अनमोल ठेवा आहे. आजवर स्पर्धा जाणवत होती मात्र आज मिळालेल्या पठींब्यामुळे मी प्रथम स्थानी अलोय याचा आनंद आहे.**

**विवेक कोल्हे, उमेदवार**

# शुभम वाघमारे यांची पुरवठा निरीक्षकपदी निवड

## विविध मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

पारनेर : प्रतिनिधी

**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या परिक्षेत शुभम संजय वाघमारे यांची पुरवठा निरीक्षकपदी निवड झाली आहे.शुभम हा पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे यांचा मुलगा तर पारनेर दर्शनचे कार्यकारी संपादक विजय वाघमारे यांचा पुतण्या आहे.**



संरक्षण शास्त्र (डिफेन्स सायन्स), तत्वज्ञान (फिलोसॉफी) या विषयात शुभम पहिल्याच प्रयत्नात नेट आणि सेट परीक्षा उत्तीर्ण झालेला आहे.उत्तर कोरियातील विद्यापीठाने शुभमला फेलोशिप प्रदान केली होती.

शुभमच्या यशाबद्दल खासदार नीलेश लंके,राष्ट्रवादी उर्वरीत पान ३ वर












स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# पावसाळ्यात कागदी लिंबाचे उत्पादन..!

## लागवड करताना




लागवड पावसाळी काळात करावी. रोपांच्या मुळांचे आकारमान व वाढ लक्षात घेऊनच खड्ड्यातील माती बाजूला करावी. रोपे मुळांना इजा होणार नाही अशा बेताने घट्ट दाबावीत. रोप लावल्यानंतर आळे करून लगेच पाणी द्यावे. रोप लागवडीच्या वेळी शेंड्याकडील ४ ते ५ पाने ठेवून बाकी सर्व पाने काढून टाकावीत. २.५ ग्रॅम कॉपर ऑक्झीक्लोराईड प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. या द्रावणात लागवड करण्यापूर्वी रोपे दहा मिनिटे बुडवावीत. त्यानंतर लागवड करावी. लागवडीपूर्वी जमीन उभी-आडवी नांगरट करून व २ ते ३ कुळवाच्या पाळ्या द्याव्यात. लागवड चौरस पद्धतीने ६ बाय ६ मीटर अंतरावर १ बाय १ बाय १ मीटर आकारचे खड्डे खोदावेत. चांगली माती किंवा पोयटा ४ ते ५ घमेली शेणखत, १ किलो निबोंळी पेंड, दीड ते दोन किलो सिंगल सुपर फॉस्फेट मिश्रणाने खड्डे भरावेत.

**लिंबू लागवडीसाठी जास्त चुनखडी, क्षार नसणारी जमीन योग्य असते. भारी, पाणथळ, चोपण तसेच खडकाळ जमिनीत लागवड करू नये. लागवडीसाठी साई शरबती आणि फुले शरबती या जातींची निवड करावी. दीर्घकाळ दर्जेदार फळांचे उत्पादन मिळण्यासाठी झाडांचा सांगाडा व खोड मजबूत होणे आवश्यक आहे. लिंबू हे बहुवर्षीय फळझाड असल्यामुळे लागवडीसाठी मध्यम काळी, हलकी, मुरमाड, पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६.५ ते ८ असावा. चुनखडीविरहीत क्षाराचे प्रमाण ०.१ टक्यापेक्षा कमी असलेली जमीन लागवडीस योग्य असते.**

## रोपांची निवड

- राज्यात लिंबाची लागवड बियांपासून केलेली रोपे लावून करण्याची शिफारस.
- बियापासून केलेली रोपे लागवडीच्या वेळेस पूर्णतः रोगमुक्त असतात, म्हणून महाराष्ट्राच्या हवामानात बियांपासून तयार केलेली रोपे लावावीत.
- रोपे कृषी विद्यापीठाची रोपवाटिका किंवा शासकीय नोंदणीकृत रोपवाटिकेतून खरेदी करावी.

## लागवडीनंतरची काळजी



दीर्घकाळ दर्जेदार फळांचे उत्पादन मिळण्यासाठी झाडांचा सांगाडा व खोड मजबूत होणे आवश्यक आहे, तसेच झाडांना वळण देणे आवश्यक आहे, परंतु पहिली दीड वर्ष कसलीच छाटणी करू नये. रोपे दोन वर्षांची झाल्यावर वळण द्यावे, त्यासाठी आवश्यक तेवढीच छाटणी करावी. पूर्ण वाढलेल्या झाडाचे मुख्य खोड जमिनीपासून साधारणपणे ७५ सें. मी. पर्यंत सरळ असावे. या उंचीवर चोहोबाजूला विखुरलेल्या स्थितीत ३ ते ४ जोमदार फांद्या ठेवाव्यात. मुख्य खोडावर आलेली फूट अंकुर अवस्थेत असतानाच काढत राहावी. दाट झालेल्या व रोगट फांद्या आणि पाणसोट काढून टाकावेत. छाटणी केलेल्या जागेवर बोर्डोपेस्ट (१० टक्के) लावावी. रोपांना नियमित पाणी द्यावे.

# लिंबूवर्गीय पिकांना अन्नद्रव्ये



**लिंबूवर्गीय पिके अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यासाठी संवेदनशील असतात. अन्नद्रव्यांची कमतरता भासल्यास त्याची लक्षणे पाने, फुले आणि वाढीवर त्वरित दिसतात. ही लक्षणे ओळखून योग्य ती उपाययोजना वेळीच करण्याची गरज असते. अन्नद्रव्यांची कमतरता लिंबूवर्गीय फळझाड पानांद्वारे, फळांद्वारे दाखवते. त्याचप्रमाणे वाढीवर विपरीत परिणामही दिसून येतो. अन्नद्रव्यांच्या कमतरतेची लक्षणे कशी ओळखायची ते पाहू...**

## पालाश

पेशींच्या विभाजनासाठी पालाशची गरज असते. पालाशमुळे झाडात कडकपणा येतो. झाड रोगास व कीडीस बळी पडत नाही. झाडाची पाण्याचा ताण व कडाक्याची थंडी सहन करण्याची क्षमता वाढते. पालाश हा नवतीमध्ये जास्त असतो. पुढे पानामधून परिपक्व फळाम ध्ये जातो. फळांची प्रत सुधारते. उत्पादनात वाढ होते.

- कमतरेची लक्षणे : संत्रा झाडाची पाने पिळल्यासारखी वेडीवाकडी व सुरकुत्या पडल्यासारखी होतात. शेंड्याची वाढ थांबते. झाडे खुरटल्यासारखी होतात. पानांचा रंग पिवळा ते तपकिरी होतो. फळांचा आकार लहान राहतो.
- उपाययोजना : पालाशची कमतरता असलेल्या जमिनीमध्ये पोटॅशिअम सल्फेट किंवा म्युरेट ऑफ पोटॅश या खतांचा वापर करावा. झाडावर पोटॅशिअम नायट्रेटची एक टक्के फवारणी करावी. आपल्याकडील जमिनीमध्ये पालाशचे प्रमाण भरपूर असले तरी ते उपलब्ध स्वरुपात नसते. परिणामी वरखतातून ती गरज भागवावी लागते. त्याचप्रमाणे पालाशचे अधिक्य असलेल्या जमिनीत जस्त, मॅग्नेशिअम आणि मॅगेनीजची कमतरता भासते. लिंबूवर्गीय फळपिके असलेल्या जमिनीचे पृथःकरण केल्यानंतर प्रामुख्याने या जमिनीत लोह, जस्त, मॅगेनीज, तांबे या चार अन्नद्रव्यांची कमतरता असल्याचे दिसून आले आहे.



## नायट्रोजन (नत्र)

नत्र हे अन्नद्रव्यांचे संतुलन चक्र समजले जाते. या अन्नद्रव्यांमुळे अन्य अन्नद्रव्य उपलब्ध होतात. या अन्नद्रव्यामुळे झाडांची वाढ जोमदार होते. बहार येण्यासाठी नत्राची आवश्यकता असते. बहार येताना पानातील नत्र हे फुलांमध्ये जाते. फुले टिकून राहून, फळधारणा होते.

- कमतरतेची लक्षणे : पाने पिवळी किंवा फिक्कट पिवळी पडतात. पानांच्या शिरासुद्धा पिवळ्या पडतात. झाडाच्या डहाळ्या वाळण्यास सुरुवात होते. झाडांची वाढ खुंटते, फळांचा आकार लहान होतो. झाडाचे एकूण आयुष्य कमी होते. नत्राची कमतरता असलेल्या झाडांवर प्रमाणापेक्षा जास्त बहार येऊन फळगळ मोठ्या प्रमाणात होते.
- उपाययोजना : चांगले कुजलेले शेणखत ५० किलो प्रतिझाड द्यावे. नत्राची शिफारशीत मात्रा दरवर्षी झाडांना द्यावी. कमतरता दिसल्यास एक टक्के युरियाची फवारणी करावी. त्वरित परिणाम मिळतात. हिरवळीचे खत तयार करणारी पिके घेऊन जमिनीत गाडावीत. (उदा. बोरू.)

### स्फुरद

स्फुरदाच्या कमतरतेमध्ये पाने करड्या किंवा फिक्कट हिरव्या रंगाची दिसतात. जुनी पाने खाली पडण्याअगोदर वेडीवाकडी होतात. पक्व झालेली फळे मऊ आणि ओबडधोबड होतात. झाडाची वाढ खुंटते. पानांची गळ होऊन पाने विरळ होतात. बहाराची फुले तरळक येतात. कळ्या सुप्तावस्थेत राहून सुकतात. फळधारणा कमी होते. फळांची प्रत बिघडते. अन्नरस निर्माण होण्याची क्रिया मंदावते.

- उपाययोजना : स्फुरदाची योग्य मात्रा दरवर्षी झाडांना द्यावी. स्फुरदाची कमतरता दिसून आल्यास पाने व जमि नीचे पृथःकरण करून घ्यावे. त्यानुसार खते द्यावीत.

## जस्त (झिंक)

चुनखडीयुक्त जमिनीत जस्ताची कमतरता असल्याचे आढळते.

- कमरतेची लक्षणे : शेंड्याकडील पानांच्या शिरांमध्ये पिवळे ठिपके दिसतात. पानांच्या मध्य व इतर शिरा बाजूने रंगहीन होतात. पाने लहान अरुंद, टोकदार आणि वेडीवाकडी होतात. कधीकधी पिवळ्या पडलेल्या भागांवर हिरवे ठिपके आढळतात. जस्तांच्या कमरतेमुळे झाडांच्या डहाळ्या उभट आणि झुपकेदार होतात. वेडीवाकडी झालेली पाने लवकर खाली पडून शेंडेमरसारखी लक्षणे दिसतात. फळे लहान, ओबडधोबड आणि पांचट होतात.
- उपाययोजना : झिंक सल्फेट ०.२ टक्के तीव्रतेची नवीन नवतीवर फवारणी करावी.

## मॅगेनीज

- करमतरेची लक्षणे : फिक्कट हिरव्या रंगाच्या पानावर गर्द हिरव्या रंगाच्या शिरा दिसून येतात. या मूलद्रव्यांच्या कम तरतेमुळे फळाच्या आकारावर काही परिणाम होत नाही. झाडाच्या ज्या भागावर सावली असते, त्या भागात या मूलद्रव्याची कमतरता पानामध्ये दिसून येते.
- उपाययोजना : मॅगेनीज सल्फेट १० किलो प्रतिहेक्टर जमि नीतून द्यावे किंवा मॅगेनीज सल्फेट ०.५ टक्के अधिक चुना ०.२५ टक्के यांची फवारणी करावी किंवा मॅगेनीज सल्फेट ०.३ टक्के फवारणीद्वारे द्यावे.

## लोह (आयर्न)

- कमतरेची लक्षणे : या मूलद्रव्यांच्या कमतरतेचे मुख्य लक्षण म्हणजे पाने फिक्कट हिरवी किंवा पिवळी पडून त्यावर जाळीदार शिरा दिसून येतात. अशी पाने गळून पडतात. फळांचा आकार वाढत नाही. साधारणपणे अल्कधर्मी जमिनीत या अन्नद्रव्याची कमरता जाणवते.
- उपाययोजना : जमिनीतून फेरस सल्फेट १० किलो प्रतिहेक्टर या प्रमाणात द्यावे. झाडावर ०.४ टक्के फेरस सल्फेट अधिक चूना ०.२ टक्के यांची फवारणी करावी.

## तांबे (कॉपर)

- कमतरतेची लक्षणे : कोनात निघणाऱ्या फांद्यावरील पाने लांब, मऊ (ठिसूळ) होतात. नवीन निघणाऱ्या फांद्यासारख्या आकारात वाढतात. लहान फांद्यावर पाने येतात व लवकर गळतात. फांद्याच्या सालीवर डिंक बाहेर येतो. या मूलद्रव्याची कमतरता पानांपेक्षाही फळांवर अधिक प्रमाणात दिसून येते. फळांवर गडद तपकिरी रंगाचे काळे ठिपके व डिंकयुक्त उंचवटे दिसून येतात.
- उपाययोजना : झाडांवर ०.३ टक्के कॉपर सल्फेट अधिक चूना ०.२ टक्के यांची फवारणी करावी. नत्रयुक्त खतांचा जास्त वापर करू नये. बुरशीनाशकांची फवारणी करताना ताम्रयुक्त बुरशीनाशकांचा वापर करावा.



## रासायनिक खते देताना...

- जमिनीत पुरेसा ओलावा असावा.
- भर पावसात खते देऊ नयेत.
- अन्नद्रव्ये नवी पालवी फुटण्याच्या कालावधीमध्ये उपलब्ध होतील अशा प्रकारे द्यावीत.
- खते विभागून दिल्यास कार्यक्षमता वाढते.
- शेणखत आणि कंपोस्ट खतांचा वापर नियमित करावा.
- जमिनीची आम्लता व क्षारता न वाढवणारा खते वापरावीत.
- खताची कार्यक्षमता वाढवण्यासाठी जैविक खतांचा वापर करावा.

## सूक्ष्म अन्नद्रव्ये देताना घ्यावयाची काळजी

काही सेंद्रिय आम्ले विशेषतः सॅलिसिलीक आम्ल, टार्टारीक आम्ल, सायट्रिक आम्ल ही सौम्य प्रमाणात चिलेटिंग करतात. त्यामुळे ही खते चांगल्या कुजलेल्या शेणखतातून द्यावीत. चिलेटिंग स्वरुपात सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर केल्यास सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खतांम ध्ये १० ते २० टक्के एवढी कपात करता येते. बागेतील झाडांचा ताण संपल्यानंतर पहिले पाणी दिल्यानंतर सूक्ष्म अन्नद्रव्यांची पहिली फवारणी करावी. त्यामुळे येणाऱ्या नवीन फुटीला ही अन्नद्रव्ये उपयोगी पडतील. पहिल्या फवारणीनंतर तीन ते चार महिन्यांनी दुसरी फवारणी करावी. त्यामुळे झाडे अधिक सशक्त आणि तजेलदार राहून फळे भरपूर येतात.

# खरिपात बटाटा लागवड करताना

**बटाटा पिकाची वाढ आणि विकास जमिनीच्या आत होत असतो. त्यामुळे बटाटा पीक यशस्वी होण्यासाठी जमिनीची निवड अत्यंत महत्त्वाची ठरते. पाण्याचा योग्य निचरा होणारी व भुसभुशीत, पोयट्याची जमीन निवडावी. जमिनीमध्ये पाणी साचून राहत असल्यास बटाटा विकासाच्या काळात फळ सड होऊ शकते. जमीन पाणी दिल्यानंतर घट्ट बनत असल्यास बटाटा कंदाची वाढ योग्य प्रकारे होत नाही.**

बटाटा पिकासाठी हलक्या थंड वातावरणाची गरज असते. बटाट्याच्या योग्य वाढीसाठी २२ ते २४ अंश सेल्सिअस तापमानाची गरज असते. बटाटा वाढ व विकास जमिनीच्या अंतर्गत होते. शाकीय वाढीनंतर बटाटा कंदाची (विकसित रूपांतरित खोड) निर्मिती होण्यासाठी १८-२० अंश सें. तापमानाची गरज असते. यास ट्युबरलायझेशन असे म्हणतात.



## लागवड पद्धत अन् अंतर

योग्य वाढ व विकास होण्यासाठी लागवड ही गादी वाफ्यावर करावी. काही ठिकाणी सरी वरंबा पद्धतीचा वापरही केला जातो. दोन्ही ओळींमधील अंतर दोन फूट, तर झाडांमधील अंतर जमिनीचा मगदूर व जातीनुसार ३० सें.मी. किंवा ४५ सें.मी. ठेवावे.

## बेणे निवड अन् प्रक्रिया

लागवड करण्यासाठी, सुप्तावस्था पूर्ण झालेल्या कंदांची निवड करावी. काढणी केल्याबरोबर ताबडतोब लागवडीसाठी निवड करू नये. बटाट्यामध्ये सुप्तावस्था असल्यामुळे काही काळ साठवणूक केल्यानंतर ज्या बेण्यावर कार्यक्षम डोळ्यांची संख्या असलेल्या बेण्याची निवड करावी. साधारणतः एक हेक्टर लागवडीसाठी १५-२० क्विंटल बेणे आवश्यक असते. बेणे साधारणतः ३०-३५ ग्रॅम वजनाचे व कार्यक्षम डोळे असणे आवश्यक असते. जर बेणे ३०-३५ ग्रॅम वजनापेक्षा जास्त असल्यास अशा बेण्याची दोन चार भागांमध्ये कापणी करावी. परंतु कापणी करत असताना कार्यक्षम डोळ्यांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. कापणी केल्यानंतर बेण्याचे वजनदेखील साधारणतः ३०-३५ ग्रॅम असावे.

## बेणे प्रक्रिया करताना...

बटाटा पिकांमध्ये उशिरा येणारा व लवकर येणारा करपा रोगांचा प्रामुख्याने प्रादुर्भाव होतो. तो टाळण्यासाठी बटाटा बेणे लागवडीपूर्वी मॅन्कोझेब ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी या द्रावणात किमान अर्धा तास बुडवावेत. २० क्विंटल बियाण्यासाठी सुमारे १०० लिटर पुरेसे होते. त्यानंतर बटाटा बेण्याच्या वाढीसाठी नत्रयुक्त घटकांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने २.५ किलो झोटोबॅक्टर अधिक ५०० मि.लि. द्रवरूप सिटोबॅक्टर प्रति १०० लिटर पाणी या द्रावणात बटाटे किमान अर्धा तास बुडवून ठेवावेत. हे द्रावण २० क्विंटल बटाटा बेण्यासाठी पुरेसे होते.

## खत व्यवस्थापन

एक हेक्टर क्षेत्रासाठी लागवडीपूर्वी किंवा लागवडवेळी रानबांधणी करताना १५-२० टन चांगले कुजलेले शेणखत मिसळून घ्यावे. लागवडीच्या वेळी रानबांधणी करताना युरिया २०८ किलो, १२८ किलो डीएपी आणि २०० किलो म्युरेट ऑफ पोटॅश प्रति हेक्टरी खत मात्रा द्यावी. साधारणपणे ४० दिवसानंतर जमिनीअंतर्गत बटाटा वाढ व विकास होण्यास सुरुवात होते. त्यानंतर बटाटा पिकांमध्ये आंतरमशागत करू नये. उदा. खांदणी, खुरपणी, भर घालणे आदी आंतरमशागतीची कामे बटाटा पीक साधारणः ३० दिवसांचे असेपर्यंतच करावी.

# भाजीपाला पिकांतील फळधारणा... समस्या अन् उपाय

**फळवर्गीय भाजीपाला पिकांच्या अपेक्षित उत्पादनासाठी योग्य वेळी लागवड, योग्य वाणाची निवड आदी बाबी महत्त्वाच्या आहेत. योग्य प्रमाणात फळधारणेसाठी इतरही अनेक घटक कारणीभूत असतात. त्यांची माहिती घेऊन लागवडीचे नियोजन व उपाययोजना कराव्यात. हवामानातील बदल, गारपीट, अन्नद्रव्य व पाणीटंचाई किंवा असमतोल वापर, कीड व रोगांचा प्रादुर्भाव, अयोग्य परागीभवन आदी कारणांमुळेही फळधारणा कमी होते.**

- योग्य जातीची निवड : भाजीपाला पिकाच्या काही जातींची पक्वता लवकर होते. काहींची उशिरा होते. त्यामुळे हंगाम व कालावधीनुसार योग्य जातींची निवड करावी.
- लागवडीचा योग्य कालावधी : वातावरणातील ताप मान, आर्द्रता, सूर्यप्रकाशाचा कालावधी, पर्जन्यमान या घटकांचा फुलांच्या निर्मितीवर, परागीभवनावर, फळधारणेवर व वाढीवर परिणाम होत असतो. म्हणून भाजीपाला लागवडीसाठी योग्य कालावधीची निवड करावी.
- समतोल अन्नद्रव्याचा अभाव : अन्नद्रव्यांची कमतरता किंवा असमतोल; तसेच अयोग्य वेळी वापर केल्यास फुलांची निर्मिती, फळधारणा कमी होते. त्यासाठी मातीपरीक्षणानुसार पिकास मुख्य व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा समतोल पद्धतीने योग्य वेळी व योग्य मात्रेत वापर करावा.
- सिंचनाचे अयोग्य नियोजन : पीक अवस्थेनुसार योग्य प्रमाणात पाणीपुरवठा करावा. गरजेपेक्षा अधिक किंवा कमी पाणी दिल्यास फलधारणा व उत्पादनावर परिणाम होतो. जमीन कायम वापसा स्थितीत राहील, शेतात पाणी साचणार नाही, याची काळजी घ्यावी. ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करावा.
- परपरागीकरण समस्या : परपरागीकरण आवश्यक असलेल्या पिकात (वेलवर्गीय भाजीपाला) नर व मादी फ ुलांचे भाग एकत्र नसतात. त्यामुळे परपरागीकरणासाठी मधमाशा, फ ुलपाखरे मदत करतात.त्यामुळे भाजीपाला उत्पादन क्षेत्रात किंवा जवळपास मधमाशी पालन करावे.
- नर व मादी फुलांचे गुणोत्तर : वेलवर्गीय भाज्यामध्ये मादी फुलांचे प्रमाण वाढल्यास उत्पादनात वाढ होते. शिफारशीत संजीवकांची पीक २ व ४ पानांच्या अवस्थेत असताना फवारणी केल्यास मादी फुलांची संख्या वाढते.
- पीकसंजीवकांचा अभाव : भाजीपाला पिकांमध्ये फळगळ संजीवकांच्या अभावामुळे होत असते. त्या मुळे फुलगळ व फळगळ थांबविण्यासाठी शिफारशीत संजीवकांचा योग्य त्या मात्रेमध्ये वापर करावा.
- योग्य अवस्थेमध्ये काढणी न करणे : फळांची काढणी योग्य अवस्थेत व योग्य वेळी केल्यास नवीन फुलांच्या निर्मितीसाठी व उपलब्ध फुलांच्या योग्य वाढीसाठी मदत मिळते.
- अयोग्य कीडनियंत्रण : पीक फुलोरा अवस्थेत आल्यानंतर कीडनाशकांचा वापर टाळावा. ते शक्य नसल्यास मधमाशांना हानिकारक असलेली कीडनाशके वापरू नयेत किंवा जैविक कीडनाशकांचा वापर करावा.

## शॉर्ट न्यूज

### आपल्या विधानाचा विपर्यास केला : लोखंडे

**कर्जत :** राम मंदिर बांधल्यामुळेच माझा पराभव झाला, असे काही टीव्ही वृत्त वाहिन्यांवर दाखवण्यात आले परंतू राम मंदिर बांधल्यामुळे मुस्लिम मतांचे झालेले एकीकरण व अकोले तालुक्यातील एका संघटनेने राम मंदिराबाबत केलेला अप्रचार, यामुळे आपला पराभव झाला असल्याचे आपण वक्तव्य केले होते. या वाक्याचा विपर्यास करण्यात आला असल्याचे माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेत लोखंडे बोलत होते. ते म्हणाले, आपण कारसेवक असून राम मंदिरासाठी जो लढा देण्यात आला, त्यात आपण प्रामुख्याने सहभागी झालो होतो.

### पशुसखींकडून पशूंना लशीकरण सुरु

**पाथर्डी :** जोगेवाडी (ता. पाथर्डी) येथील वैशाली आघाव यांनी पशु सखी म्हणून प्रशिक्षण घेत आपल्या कामास सुरवात केली आहे. पिंपळगाव तप्पा, जोगेवाडी येथील शेळ्यांना तसेच गोवंशला लंपीचे लसीकरण आणि जनजागृती त्यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. याकामी त्यांना डॉ. सोनवणे, यांनी मार्गदर्शन केले आहे. तर बचत गटाच्या सी आर पी. मीरा बडे ह्या मदत करत आहेत. परिसरातील आपल्या जनावरांना नियमित लसीकरण, करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. पशुवैद्यकीय दवाखान्याला अशा प्रकारे मदत व वेळेत काम करता येणार आहे.

### पोल्ट्रीच्या दुर्गंधीने नागरिक हैराण

**नेवासा :** तालुक्यातील बऱ्हाणपूर गावात शेतीमध्ये पोल्ट्री फार्म आहे. या पोल्ट्रीमुळे बऱ्हाणपूर, चांदा, रस्तापूर अशा तीन गावांमध्ये मोठ्या प्रमाणात माशांचे प्रमाण वाढले आहे. परिणामी गावातील लोकांना जेवण करणे, जनावरांचे दूध काढणे कठीण झाले आहे. लहान मुले आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. ग्रामस्थांसह पोल्ट्रीफार्मवर गेले असता तेथे आक्षेपार्ह गोष्टी निदर्शनास आल्या. मयत कोंबड्यामुळे परिसरात दुर्गंधी व आजाराचे प्रमाण वाढले आहे. या माशांचे प्रमाण इतके जास्त आहे की तीन गाव यामध्ये व्यापले गेले आहेत.

### महिलेचे सोन्याचे गंठण लांबवले

**संगमनेर :** तालुक्यातील चंदनापुरी येथील कामगार तलाठी म्हणून कार्यरत असणाऱ्या दुचाकीस्वार महिलेच्या गळ्यातील दोन तोळ्यांचे मिनीगंठण मेंढवणला जात असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी ओरबाडून धूम ठोकल्याची घटना मंगळवारी सव्वाचारच्या सुमारास समनापूर शिवारात घडली. भारती अशोक भुरके (वय ५०) या चंदनापुरी या मंगळवारी दुपारी मैत्रिणींसोबत मेंढवण येथे जात होत्या. त्याचवेळी समनापूर शिवारात पाठीमागून दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील २२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण ओरबाडून पळ काढला.

### श्रीगोंदेत रक्ताभिषेक आंदोलन

**श्रीगोंदा :** येथे साकार होणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज स्मारकासाठी येणाऱ्या अडचणी शासनाने लवकर दूर करून सदर शासकीय जागेवरील खासगी अतिक्रमण तत्काळ हटविण्यात येऊन त्या जागी छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभे करावे, या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडने श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर रक्ताभिषेक आंदोलन केले. या आंदोलनाला माजी आमदार राहुल जगताप, काँग्रेस नेते घनश्याम शेलार, शिवसेना उपनेते साजन पाचपुते यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला.

(पान १ वरून)

## जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास असेल तर यश निश्चित - खा. नीलेश लंके

बबलू रोहोकले,सुनील कोकरे आदींसह मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना खा.लंके म्हणाले म्हणाले, करियर करण्याचे ठराविक वय असते त्या वयात स्वतः ला झोकून दिल्यास पुढच आयुष्य हे निश्चित आनंदी राहते. गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना घरच्या हलाकीच्या परिस्थितीमुळे उच्च शिक्षण अथवा स्पर्धा परीक्षेस सामोरे जाण्यासाठी अडचण होते, त्यांच्या मदतीसाठी मी तसेच राजूभाऊ शेटे सदैव सोबत असल्याचे ते म्हणाले. यावेळी धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजूभाऊ शेटे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे स्वागत करून भविष्यात शैक्षणिक अडचण आल्यास त्याचप्रमाणे कोणत्याही कार्यासाठी आपण पुढाकार घेऊ असे सांगितले. यावेळी सेवानिवृत्त अधिकारी भागिनाथ शेटे रासपाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब जुंधारे आदींचे भाषणे झाली. यावेळी अजित येवले यांनी देशभक्तीपर गिते सादरीकरण करून उपस्थितांचे मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल येवले यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संदीप आढाव, राहुल तमनर, संदीप थोपटे, गणेश खुळे, नितीन कदम, विजय उंडे, डॉ. म्हस्के, शरद डुकरे, जालिंदर कानडे, राधु जाधव, गणेश खिलारी, उमेश खिलारी, नारायण घाडगे, हरिभाऊ झडे ,अनिल येवले, कोठुळे, अभिजीत आहेर, प्रशांत मुसमाडे,मनोज खुळे, आदिंसह धर्मवीर संभाजीराजे युवा प्रतिष्ठान व परिस्पर्श फाउंडेशनच्या सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

माझं ॲडमिशन घ्या ! या कार्यक्रमादरम्यान निवेदक अनिल येवले यांनी राहुरी फॅक्टरी येथे प्रा.अनिल येवले यांच्या माध्यमातून इंग्लिश स्पिकिंग क्लास बॅच सुरू होणार असल्याचे जाहीर करत असताना खा.लंके यांनी निवेदक येवले यांना मध्येच थांबवत माझं पण ॲडमिशन घ्या असे म्हणताच उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला माजी खा.सुजय विखे यांनी नीलेश लंके यांना इंग्रजी बोलण्याबाबतचा मुद्दा पुढे आणला होता.त्याच अनुषंगाने लंके यांनी ही मिश्किल टिपणी केली.

सेल्फीसाठी गराडा

राहुरी तालुक्यातील जवळपास साडेतीनशे विद्यार्थ्यांचा गुणगौरव खा.नीलेश लंके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपस्थित विद्यार्थी व पालक यांनी खा. लंके यांच्या समवेत सेल्फी घेण्यासाठी त्यांच्या भोवती गराडा केला होता.

तीन तास उशीरा तरीही पब्लिक जैसे थे

खासदार नीलेश लंके यांना रविवारी पारनेर तालुक्यातील भाळवणी अहमदनगर शहर व परिसरात अनेक कार्यक्रम होते ते कार्यक्रम आटपून लंके हे नगर मनमाड वरील ट्रॅफिकचा सामना करत राहुरी येथील विठ्ठला लॉन्स येथे तब्बल तीन तासांनी उशिरा पोहचले तरीही लंके यांच्या प्रतीक्षेत विद्यार्थी पालक व हितचिंतक बसून होते.खा. लंके यांची एन्ट्री होताच उपस्थितांनी आनंदाने स्वागत केले.गौरव सोहळा कार्यक्रमानंतर रात्री आठ वाजता खा.लंके पुण्यातील चाकणमध्ये एका विवाहासाठी रवाना झाले.

हार बुके टाळा वह्या पुस्तके द्या

गोरगरिब कुटुंबातील विद्यार्थी वह्या पुस्तकांवाचून वंचित राहतात त्यामुळे सत्काराचा जो खर्च होतो त्याबदल्यात वह्या पुस्तके व इतर शालेय उपयोगी साहित्य देऊन सामाजिक बांधिलकी जोपासावी यापुढे हार व बुके न आणता वह्या पुस्तके आणावे असे आवाहन खा.लंके यांनी राहुरीकरांना केले.

## नगरमध्ये वन ॲण्ड ओन्ली विवेक भैय्या!

आणि होतकरू उमेदवार लाभल्याने सर्वच शिक्षक मतदारांनी कोल्हे यांना मोठया मताधिक्क्याने विजयी करण्याचा निर्णय नगरमध्ये झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

यावेळी पार पडलेल्या बैठकीस आबासाहेब कोकाटे, मधुकर पवार, शिवाजीराव ढाळे, राजेंद्र लांडे, अशोकराव नवले, सुधीर काळे, शिरीष टेकाडे, रमजान हवालदार, सोनवणे सर, रासकर सर, वाकचौरे सर, गजानन शेटे, सुरेश बोळीज, दिलीप ढवळे, सोमना सुंबे, भगवान मडके, संजय निक्रुड, नानासाहेब सुद्रीक, जगन्नाथ आढाव, उध्दव गुंड देशमुख सर, कळसकर सर यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**निःस्पुह विवेक यांच्या पाठीशी मतदार**

टीडीएफ संघटनेच्या वतीने देण्यात आलेला उमेदवार विजयी होऊ शकत नाही, आमच्या कुटूंबाने कायम टीडीएफच्या उमेदवाराला आजवर मतदान केले आहे. मात्र गेल्या काही वर्षात संघटनेच्या उमेदवाराला यश मिळाले नसून स्व. शंकरराव कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखालील युवा नेते विवेक कोल्हे या निःस्पुह उमेदवाराच्या पाठीशी सर्वसामान्य शिक्षक मतदार खंबीरपणे उभा आहे.

राजेंद्र लांडे, मतदार

विवेक यांचे डॉ. तांबे यांच्या पावलावर पाऊल

शिक्षकाचे अनेक प्रश्न आहेत. ते सोडविण्यासाठी होतकरू उमेदवाराची आवष्यकता आहे. पद हे केवळ मिरविण्यापुरते नको तर शिक्षक हित डोळयापुढे ठेऊन शिक्षकांना साथ देणारे नेतृत्व हवे आहे. डॉ. सुधीर तांबे यांच्या पावलावर पाऊल ठेऊन सर्वसामान्य शिक्षकांना न्याय देण्यासाठी सद्य परिस्थितीत बदल केला पाहिजे. डॉ. तांबे यांच्या प्रमाणे विवेक कोल्हे हे नेतृत्व या मतदारसंघास लाभणार आहे. टीडीएफचा उमेदवार सक्रीय नाही, विवेक कोल्हे हे सर्वसामान्य शिक्षकांचा आदर ठेवणारे व्यक्तीमत्व आहे.

शिक्षक मतदारसंघातील मतदार

विवेक कोल्हे सर्वमान्य उमेदवार

आमच्याच संघटनेचे उमेदवार आमच्या नेत्यांनी पाडले. या निवडणूकीमध्ये पाचही जिल्हयाचा आढावा घेतला असता विवेक कोल्हे यांच्यासारखा उमेदवार सर्वमान्य असल्याचे चित्र आहे. स्व. शंकरराव कोल्हे यांनी तत्कालीन टीडीएफ उमेदवार राजेंद्र लाड यांच्या प्रचारात सक्रीय सहभाग नोंदविला होता. आज त्यांचे नातू मतदारांपुढे मते मागण्यासाठी येत आहेत.

शिवाजीराव ढाळे

ज्येष्ठ मार्गदर्शक

जगन्नाथाचा रथ पुढे नेणार !

सर्व शिक्षकांच्या संमती विवेक कोल्हे यांना पाठींबा जाहिर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रयत परिवारातील स्व. शंकरराव कोल्हे यांनी शिक्षकांसाठी मोठे काम केले असून ते सर्वश्रुत आहे. कोल्हे परिवार हा सर्व शिक्षकांसाठी आपलासा वाटणारा परिवार आहे. कोल्हे परिवाराचा हा जगन्नाथाचा रथ आम्ही सर्व शिक्षक प्रथम क्रमांकाने पुढे नेणार आहोत.

मधुकर पवार, जिल्हाध्यक्ष

## शुभम वाघमारे यांची पुरवठा निरीक्षकपदी निवड

काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, नगराध्यक्ष नितीन अडसुळ, उप नगराध्यक्ष जायदा शेख,पारनेर पब्लिक स्कूलचे संस्थापक,प्राचार्य गीताराम म्हस्के, किसान युनीयन परिवाराचे अध्यक्ष,माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत चेडे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य दिनेश औटी,शिक्षक नेते रा.या.औटी,माजी उपनराध्यक्षा सुरेखा भालेकर, वसंत चेडे, अशोक चेडे, नंदकुमार दरेकर,दिलीप भालेकर, विठ्ठल औटी,संजय देशमुख, बापूसाहेब हांडे यांनी अभिनंदन केले आहे.

# 'आम्ही जरांगे' मराठी चित्रपट शुक्रवारपासून प्रेक्षकांच्या भेटीला!

### जरांगे पाटलांच्या भुमिकेत शिरुरचा पृथ्वीराज थोरात

**शिरूर : प्रतिनिधी**



**मराठा आरक्षण आंदोलनाचे लढवय्ये नेतृत्व मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनकार्यावर आधारित 'आम्ही जरांगे' गरजवंत मराठ्यांचा लढा हा मराठी चित्रपट येत्या शुक्रवारपासून, ( दि. २१ जून ) प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. टीडीएम चित्रपटात मध्ये प्रमुख भूमिका साकारलेल्या शिरुरच्या पृथ्वीराज थोरात या तरुणाला या चित्रपटात मनोज जरांगे पाटील यांची व्यक्तीरेखा साकारण्याची संधी मिळाली आहे.**

शिरूर पासून जवळच असलेल्या रामलिंग जवळील एका वस्तीवरील पृथ्वीराज थोरात या तरुणाला त्याच्यातील कलागुण हेरुन चित्रपट निर्माते दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांनी सर्वप्रथम टीडीएम या बहुचर्चित मराठी चित्रपटात संधी दिली. पृथ्वीराजने ही या संधीचे सोने केले. टीडीएम मधील भूमिकेमुळे महाराष्ट्रातील प्रेक्षकांनी पृथ्वीराजला डोक्यावर घेतले. त्यानंतर त्याला आता आम्ही जरांगे या मराठी चित्रपटात मनोज जरांगे पाटील यांची भूमिका साकारण्याची संधी मिळाली आहे.

या चित्रपटात मनोज जरांगे पाटील यांचे बालपण, तरुणपण आणि मराठा आंदोलन या तीन भूमिका सक्षमपणे पडद्यावर मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. नारायणा प्रोडक्शन निर्मित आणि योगेश पांडुरंग भोसले दिग्दर्शित या चित्रपटाचे सह निर्माते उत्तमराव नारायणराव मगर, डॉ. मधुसूदन उत्तमराव मगर, विक्रम विठ्ठलराव पाटील, दमयंती विठ्ठलराव पाटील, डॉ. दत्ता यशवंतराव मोरे, योगेश पांडुरंग भोसले हे आहेत. या क्रांतिकारी चित्रपटाची कथा पटकथा सुरेश पंडित यांनी लिहिली आहे. तर संवाद सुरेश पंडित, संजय नवगिरे व किशोर गरड यांनी लिहिले असून, या चित्रपटाचे छायाचित्रकार विकास सिंह हे आहेत. पृथ्वीराज बरोबरच या चित्रपटात मकरंद देशपांडे, प्रसाद ओक, सुबोध भावे, अजय पुरकर, कमलेश सावंत, विजय निकम यांच्याही प्रमुख भूमिका आहेत.

मागील शंभर वर्षापासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या चळवळीसाठी झटलेले आणि आपल्या जीवाचे बलिदान देणारे मराठा क्रांतिवीर यांचा न पाहिलेला इतिहास पहिल्यांदाच चित्रपट रुपात रूपेरी पडद्यावर येत असल्याने प्रेक्षकांसाठी ही एक पर्वणीच असणार आहे. खऱ्या आयुष्यात मराठ्यांचा साथ मिळवल्या नंतर आता आरक्षणाच्या चर्चेत असलेल्या मनोज जरांगे पाटील ह्यांना मोठ्या पडद्यावर सुद्धा प्रेक्षकांचा तितकाच चांगला प्रतिसाद मिळेल. ''आम्ही जरांगे गरजवंत मराठ्यांचा लढा'' हा चित्रपट येत्या शुक्रवारी २१ जूनला महाराष्ट्रात सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

मराठी चित्रपट सृष्टीतील नामवंत कलाकारांच्या भूमिकांनी नटलेला हा चित्रपट रसिक प्रेक्षकांच्या पसंतीस नक्की उतरेल, असा विश्वास या चित्रपटाचे मुख्य कलाकार पृथ्वीराज थोरात याने व्यक्त केला.

**गरजवंत मराठ्यांचा लढा चित्रपटात मांडण्याचा प्रयत्न !**

**खरंच मी स्वतःला भाग्यवान समजतो मला जरांगे पाटलांची भुमिका साकारण्याची संधी मिळाली. यासाठी मला जरांगे पाटील त्यांचे वास्तव जीवन, मराठा आंदोलनाचा संघर्ष याबाबत अभ्यास करुन या व्यक्ती रेखेत मी प्राण ओतला आहे. कुठलीही जातीय तेढ निर्माण करणारा हा सिनेमा नाही. गरजवंत मराठ्यांचा लढा कसा उभा राहिला त्या पाठीमागचा इतिहास आणि तो प्रकर्षाने मांडण्याचा प्रयत्न या चित्रपटातून केला आहे. खूप मोठमोठ्या दिग्गज कलाकारांनी यामध्ये काम केले आहे. सर्वांनी २१ जूनला जवळच्या चित्रपटगृहात जाऊन हा चित्रपट अवश्य पहावा.**

**पृथ्वीराज थोरात**
**मुख्य कलाकार, आम्ही जरांगे मराठी चित्रपट**









# रणजीत भालेकर यांची असिस्टंट कमाडंटपदी निवड

## खडतर परिक्षा आणि मुलाखतीमधून यश

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शहरातील रणजीत पद्माकर भालेकर यांची इंडीयन कोस्टगार्डमध्ये असिस्टंट कमाडंटपदी नुकतीच निवड झाली. या पदासाठीची खडतर लेखी परीक्षा व मुलाखत यशस्वीरित्या पार करून रणजीत यांनी हे यश संपादन केले आहे. शहराच्या मा. उपनगराध्यक्षा तथा नगरसेविका सुरेखा भालेकर तसेच राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर यांचे रणजीत हे पुतणे आहेत.**

आपल्या यशाबद्दल रणजीत यांनी सांगितले की, इंडियन कोस्टगार्डमध्ये असिस्टंट कमाडंट होण्याचे आपले स्वप्न होते. एनडीए समकक्ष असलेल्या १० प्लस २ टीईएस आर्मी ही परीक्षा आपण बारावीनंतर दिली होती. त्यासाठी परीक्षा तसेच पाच दिवसांची मुलाखतही दिली. मात्र त्यात यश आले नाही. पुढे श्रीरामपुर येथील आरबीएनबी कॉलेजमध्ये मॅथेमॅटीक्सची पदवी घेतली. पदवीनंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठातून संख्याशास्त्र विभागाचे पदव्युत्तर शिक्षण पुर्ण केले. त्यानंतर पुन्हा संरक्षण विभागाच्या परीक्षा देण्यास सुरूवात केली.

युपीएससी सीडीएस, एअरफोर्स कॅट तसेच कोस्ट गार्डमधील अधिकारी पदाच्या परीक्षांचा अभ्यास करून त्या परीक्षा दिल्या. विविध परीक्षांमध्ये यश येत असे मात्र मुलाखतीमध्ये मात्र यश येत नव्हते. मात्र रणजीत यांनी खचून न जाता आपली तयारी सुरूच ठेवली. अखेर त्यांना या परीक्षत यश प्राप्त झाले.



पारनेर शहरातील रणजीत भालेकर यांनी इंडियन कोस्टगार्डमध्ये असिस्टंट कमाडंट म्हणून निवड झाल्यानंतर खासदार नीलेश लंके यांनी नवी दिल्ली येथे महाराष्ट्र सदन येथे त्यांचा सत्कार केला.

### १४ व्या प्रयत्नांत यश

रणजीत यांनी तब्बल ९ वर्षे खडतर परीश्रम घेत १४ परीक्षा व १४ मुलाखती दिल्या. मुलाखतींमध्ये यश येत नसल्याने त्यांचे प्रयत्न सुरूच होते. अखेर १४ व्या प्रयत्नात मुलाखतीमध्ये त्यांना यश येउन त्यांची असिस्टंट कमाडंटपदावर नियुक्ती झाली. या परीक्षेत ४०० विद्यार्थ्यांची निवड झाली होती. त्यातील ७ उमेदवारांना ऑफर लेटर देण्यात आले. सातपैकी दोन विद्यार्थ्यांची त्यातून अंतिम निवड करण्यात आली. त्यात रणजीत यांचा समावेश आहे. या परीक्षेसाठी ४०० मार्कांची लेखी तर ९०० मार्कांसाठी मुलाखत असते.

### पारनेरकरांची गुणवत्ता अधोरेखीत

पारनेर तालुका हा बुध्दीमंतांची खाण आहे. रणजीत यांनी देशपातळीवरील खडतर परीक्षत यश संपादन करीत पारनेरकरांची गुणवत्ता सिध्द केल्याचे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले. लंके हे नवी दिल्ली येथे कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी गेले असता तिथे रणजीत हे वैद्यकिय चाचणी तसेच कागदपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित होते. लंके यांनी रणजीत यांना महाराष्ट्र सदन येथे बोलवून घेत त्यांचा सत्कार केला. रणजीत यांच्या खडतर प्रवासाचे कौतुक करीत खा. लंके यांनी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र भवनातून परतताना खा. लंके यांनी रणजीत यांना त्यांच्या वाहनापर्यंतही सोडले.

### भालेकर कुटूंबासाठी कौतुक

रणीजीत यांचे वडील पद्माकर हे नौदलात होते. निवृत्तीनंतर आता ते उपप्रादेशिक परीवहन अधिकारी म्हणून नांदेड येथे कार्यरत आहेत. पद्माकर यांनीही आपले कर्तुत्व सिध्द करीत भालेकर कुटूंबाचे नाव उंचावले. आता त्यांचे चिरंजिव रणजीत यांनीही निर्भेळ यश संपादन करून भालेकर कुटूंबाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून रणजीत यांचे आमच्या कुटूंबासाठी कौतुक आहे.

अर्जुन भालेकर, उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस
सुरेखा भालेकर, मा. उपनगराध्यक्षा तथा नगरसेविका

माझ्या पालकांनी दाखविलेला विश्वास, केलेले संस्कार माझ्या यशासाठी कामी आले. दिर्घ अपयशनंतरही अभ्यासात सातत्य राखण्यासाठी पालकांचे पाठबख मोलाचे ठरले. मोठया बहिणीने मला अभ्यासात कधीही ढिले पडू दिले नाही. माझ्या यशामध्ये बहिण शामल हिचे सर्वाधिक योगदान आहे.

रणजीत भालेकर, असिस्टंट कमाडंट
इंडीयन कोस्टगार्ड

# गुरूमाऊली पोदार लर्न स्कूलचे उद्‌घाटन संपन्न

## विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत ■ स्कूलच्या पहिल्या शैक्षणिक वर्षाला सुरुवात

**पारनेर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्रासह देशात नावाजलेल्या पोदार लर्न स्कूलच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या पारनेर येथील गुरूमाऊली पोदार लर्न स्कूलच्या पहिल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहात झाली.शाळेच्या पहिल्या दिवशी गुलाब पुष्प देऊन,पेढा भरवून विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.यावेळी शाळेच्या इमारतीवर व परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती.पारनेर शहराच्या उत्तरेला, जामगाव रस्त्यावर, निसर्गरम्य परिसरात उभारण्यात आलेल्या शाळेतील प्रसन्न वातावरणामुळे या शाळेत प्रवेश घेतलेले चिमुरडे हरखून गेले होते.**

शिवमावळे कृतज्ञता प्रतिष्ठान संचलित गुरूमाऊली पोदार लर्न स्कूलचे अध्यक्ष राम गाडेकर, सचिव मच्छिंद्र मते,खजिनदार काशिनाथ फंड,विश्वस्त विकास दळवी, ऋषिकेश पवार,पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य दिनेश औटी, अनिरुद्ध कासार, उद्योजक परशुराम फंड, तुषार औटी, संदीप अंबुले आदी उपस्थित होते.



गुरूमाऊली पोदार लर्न स्कूलच्या वतीने धनश्री वैद्य या विद्यार्थिनीला दत्तक घेण्यात आले.

पारनेरचे माजी सरपंच ना.पा.मते यांच्या स्मरणार्थ धनश्री बाळासाहेब वैद्य या विद्यार्थिनीला गुरूमाऊली पोदार लर्न स्कूलने दत्तक घेतले.या विद्यार्थिनीचा शिक्षणाचा सर्व खर्च विद्यालय करणार आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमासह कौशल्याधिष्टीत अभ्यासक्रमावर गुरूमाऊली पोदार लर्निंग स्कूलमध्ये भर देण्यात आला आहे.त्यादृष्टीने गुणवत्ताधारक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे संस्थेचे अध्यक्ष मच्छिंद्र मते,राम गाडेकर, काशिनाथ फंड यांनी सांगितले.

# सर्वेश नरसाळे बी.टी.एस.परीक्षेत राज्यात प्रथम

## इस्रो अभ्यास सहलीसाठी निवड

**अळकुटी : प्रतिनिधी**

**एजूमिट अकॅडमी महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने घेण्यात आलेल्या भारत टॅलेंट सर्च परीक्षा (बी टी एस ) २०२४ चा अंतिम निकाल नुकताच जाहीर करण्यात आला यात राज्यभरातून इयत्ता आठवीमध्ये १५० पैकी १३८ गुण मिळवत साईनाथ हायस्कूल व ज्युनियर कॉलेज अळकुटी ता.पारनेर चा विद्यार्थी सर्वेश रामदास नरसाळे याने राज्यात प्रथम क्रमांक मिळवून त्याची सदर अभ्यास सहलीसाठी निवड करण्यात आली.**

राज्यस्तरीय असणारी ही परीक्षा राज्य सुमारे २५० पेक्षा अधिक केंद्रावर घेण्यात आली. इयत्ता पहिली ते आठवीचे २० हजार पेक्षा जास्त विद्यार्थी सदर परीक्षेस प्रविष्ट झाले होते यातील सर्व विद्यार्थ्यांमधून २८ विद्यार्थ्यांची इस्रो अभ्यास सहली करता गुणवत्तेनुसार निवड करण्यात आली.



सर्वेश याने आत्तापर्यंत शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ता यादीमध्ये क्रमांक ,नवोदय ,तसेच चित्रकला परीक्षांमध्ये उज्वल यश संपादन केले आहे. सर्वेशचे वडील रामदास नरसाळे आई शितल दाते (नरसाळे) दोघेही प्राथमिक शिक्षक म्हणून अहमदनगर जिल्हा परिषदेमध्ये शिक्षक म्हणून सेवा बजावत आहेत सर्वेशने मिळवलेल्या या यशासाठी साईनाथ विद्यालयाचे प्राचार्य एम.के.जाधव ,पर्यवेक्षक व सेवक वृंद ,माजी विद्यार्थी ,अध्यक्ष,सदस्य स्थानिक स्कूल कमिटी ,सल्लागार समिती ,शाळा व्यवस्थापन समिती श्री साईनाथ विद्यालय व आजी-माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य ,चेअरमन ,व्हाईस चेअरमन व समस्त ग्रामस्थ अळकुटी यांचे वतीने अभिनंदन करण्यात आले.


# पावसाने उघडीप दिल्याने खरीप हंगामातील पेरणीला वेग

## पहिल्याच पावसात ओढे नाले दुथडी वाहिले

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील काही भागात पावसाने उघडीप दिल्याने खरीप हंगामातील पेरणीला वेग आला आहे. तर काही भागात पाऊसाने अद्याप उघडीप न दिल्याने पेरण्या रखडल्या आहेत. चालू वर्षी रोहिणी नक्षत्र कोरडे गेल्यानंतर जुन महिन्यात शनिवार दि. ८ व रविवार दि.९ रोजी पावसाने जोरदार हजेरी लावली. बऱ्याच वर्षांनंतर वेळेत झालेल्या पावसाने शेतकऱ्यांचा आनंद द्विगुणित झाला. पहिल्याच पावसात ओढे नाले केटिवेअर दुथडी भरून वाहू लागले. या आशेवर शेतकऱ्यांनी खरीप हंगामाची तयारी सुरू केली.**

खरीप हंगामातील मुग व बाजरी बियाणे बाजारभाव वाढल्याने मुग २०० ते २५० रुपये प्रतिकिलो तर बाजरी ५०० ते ७.५० रुपये प्रतिकिलो तर वाटाणा ७ ते ७.५ हजार प्रति ४० किलो प्रति बॅग, कांदा २ हजार ते २५०० रूपये किलोने खरेदी करावे लागत आहे. हे महागडे बियाणे खरेदी करून शेतात वापसा होताच खरीप हंगामाची पेरणी केली जात आहे.



भोयरे गांगर्डा ता. पारनेर येथे पावसाने उघडीप दिल्याने खरीप हंगामातील पेरणीला वेग आला आहे.(छाया - शरद रसाळ, सुपा)

गेली दोन वर्षे खरीप हंगाम वाया गेल्याने बीयाण्यांच्या किमतीत कमालीची वाढ झाली आहे. दरम्यान कमी कष्टात व नगदी पीक म्हणून मुग या पिकाकडे पाहीले जाते. या वर्षी पाऊस समाधानकारक झाल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक घडी बसणार असल्याने सर्वत्र समाधानाचे वातावरण आहे.

सुपा जिरायती पट्ट्यात संपूर्ण शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. बऱ्याच वर्षाच्या कालखंडानंतर सुपा, हंगा, मुंगशी, जातेगाव, घाणेगाव, गटेवाडी, पळवे, नारायणगव्हाण, वाडेगव्हाण, पाडळी रांजणगाव, कडूस, भोयरे गांगर्डा, बाबुर्डी, आपधूप, रूईछत्रपती, वाळवणे, पिंपरी गवळी, रांजणगाव मशीद, रायतळे, अस्तगाव आदी ठिकाणी पेरणी योग्य पाऊल झाल्याने खरीप हंगामातील मुग, बाजरी, वाटाणा, तुर, जनावरांसाठी, मका, कडवळ, घास आदींची पेरणी व सोगणीला वेग आला आहे. तर हंगा नदी दुथडी भरून वाहिल्याने तसेच ओढे नाले केटिवेअर पाण्याने तुडुंब भरल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला असल्याने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

# राज्य मराठी पत्रकार संघाची पारनेर तालुका कार्यकारिणी जाहीर

## राज्याचे प्रदेशाध्यक्ष संजय भोकरे, महासचिव विश्वास आरोटे व जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाचपुते यांची मान्यता



राज्य मराठी पत्रकार संघाची पारनेर तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली यावेळी राज्य मराठी पत्रकार संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक व पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

**पारनेर : प्रतिनिधी**

**गेली तीन महिन्यांपूर्वी राज्य मराठी पत्रकार संघाने महासचिव विश्वास आरोटे यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाचपुते यांच्या नेतृत्वाखाली पारनेर तालुका अध्यक्ष म्हणून बाबाजी वाघमारे व जिल्हा उपाध्यक्ष विनोद गायकवाड, तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे , राम तांबे , संपतराव कपाळे यांची नियुक्ती जाहीर केली होती.**

नुकतीच पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाची बैठक ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर, संजय मोरे, ज्ञानेश्वर लोंढे व सतिष रासकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व जिल्हा उपाध्यक्ष विनोद गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पारनेर येथे घेण्यात आली यावेळी तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली व राज्याचे पदाधिकाऱ्यांना याबाबत संपर्क करण्यात आला त्यांनीही नूतन कार्यकारिणीला मान्यता देऊन अभिनंदन केले आहे.

यामध्ये कार्याध्यक्ष - शिरिष शेलार, उपकार्याध्यक्ष - भास्करराव कवाद, सचिव - लतिफ राजे, सहसचिव - जयदीप कारखीले, खजिनदार - अविनाश भांबरे, प्रसिद्धी प्रमुख - विजय रासकर, प्रवक्ते - जयसिंग हरेल, पारनेर शहराध्यक्ष - संतोष सोबले, निघोज शहराध्यक्ष - आनंद भुकन, कार्यकारिणी सदस्य - अनिल चौधरी, विलास शेंडकर, अभिजित कपाळे, सागर आतकर, संदीप गाडे, भगवान श्रीमंदीलकर, किरण थोरात, स्वप्नील भालेराव, योगेश खाडे, संदीप ईधाटे ॲड .गोपाळे, मंगेश वराळ पाटील, रोहन उनवणे आदिंची निवड करण्यात आली आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पारनेर तालुका मराठी पत्रकार संघ कार्यक्षमपणे तालुक्यात काम करीत असून सर्व पदाधिकारी अनुभवी असून सामाजिक सेवेचा त्यांना मोठा अनुभव आहे.बातमी माध्यमातून तालुका विकासाला गती मिळाली पाहिजे सर्व सामान्य जनतेचे कामे झाली पाहिजेत यासाठी प्रयत्न करण्याची गरज असून लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारीतेला जगात राजमान्यता मिळाली असून सामाजिक कामांच्या माध्यमातून एक समाजापुढे आदर्श निर्माण करण्याचे काम पत्रकारांकडून झाले पाहिजे. पारनेर तालुका कार्यकारिणी ही सर्वोत्तम असून जुन्या नव्यांचा समन्वय साधीत सर्वांनी विचारविनिमय करीत कार्यकारिणी तयार केली असून राज्य मराठी पत्रकार संघ तसेच जिल्हा मराठी पत्रकार संघाचे पाठबळ सातत्याने मिळणार आहे.

दत्तात्रय पाचपुते

### पत्रकार संघाला कार्यालय देणार जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाचपुते

राज्य मराठी पत्रकार संघाचे पारनेर शाखेचे ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर यांनी पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयासाठी निघोज येथील त्यांच्या मळगंगा मंदीरासमोरील कन्हैया ज्वेलर्सच्या बिल्डींगमधील एक गाळा कायमस्वरूपी उपलब्ध करून दिला असून कार्यालयाचे उद्घाटन खासदार नीलेश लंके यांच्या शुभहस्ते शुक्रवार दि.२१ रोजी होणार असल्याची माहिती तालुका अध्यक्ष बाबाजी वाघमारे यांनी दिली आहे.

# सत्संग सोहळयानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

## संत निरंकारी सत्संग परीवाराचा उपक्रम

**पारनेर : प्रतिनिधी**

**सदगुरू माता सुदीक्षा महाराज यांच्या आशिर्वादाने दि. २० ते २३ जुन दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवार दि.२० जुन रोजी स्वच्छता अभियानाने या सोहळयास प्रारंभ होणार आहे.**

गुरूवारी सकाळी ८ ते १० दरम्यान पारनेर पोलीस ठाण्याच्या आवारात स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार असून पोलीस निरीक्षक समिर बारवकर हे या अभियानाचे उदघाटन करणार आहेत. शुक्रवार दि. २१ रोजी सकाळी ७ ते ११ दरम्यान बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले असून पुणेवाडी, सोबलेवाडी, पारनेर व चिंचोली असा या रॅलीचा मार्ग असेल. पुणेवाडीच्या सरपंच दिपालीताई रेपाळे तसेच भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सिताराम बापू पुजारी यांच्या हस्ते रॅलीचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

शनिवार दि. २२ जुन रोजी संत निरंकारी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने संत निरंकारी सत्संग भवन चिंचोली येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पारनेर ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. संदीप वैरागर हे या शिबिराचे उदघाटन करणार आहेत. सकाळी १० ते ३ या वेळेत हे शिबिर संपन्न होणार आहे.

रविवार दि. २३ जुन रोजी पुणेवाडी येथील श्री भैरवनाथ मंदीराच्या प्रांगणात भव्य सत्संग सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. योवळी सेलू, बीड येथील अशोक राउत यांची प्रमुख उपस्थिती असेल. सत्संग समाप्तीनंतर ब्रम्हज्ञान आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्संगामध्ये मोठया संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संत निरंकारी सेवा मंडळ, हरिष खुबचंदानी, जयसिंग बोरूडे, भास्कर पिंपरकर, संतोष रेपाळे यांनी केले आहे.

# चंद्रकला सोनार यांचे निधन



**राहुरी : प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील मुसळवाडी येथील रहिवासी गं. भा.चंद्रकला ज्ञानेश्वर सोनार यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ४० वर्षांच्या होत्या.त्यांच्या पश्चात सासू, सासरे, तीन मुली असा मोठा परिवार आहे. भानुदास सोनार यांच्या त्या सुनबाई होत. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com